मे. इंडस ऑरगॅनिक्स, ए-१२, एमआयडीसी, गोरेगाव, ता. गोरेगाव, जिल्हा गोंदिया यांच्या ५ कि.लि/ दिन क्षमतेचे महुआ फुल/फळांवर आधारित आसवानी प्रकल्प, तसेच स्पिरिट / लिकरचे ब्लेंडिंग आणि बॉटलिंग प्रकल्प उभारण्याकरीता आवश्यक पर्यावरण विषयक अनुमतीकरीता जाहीर लोकसुनावणीचे दि. १८/०९/२०२६ वेळ दुपारी १२.३० वाजता चे इतिवृत्त.

*******

केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाच्या अधिसूचना दि. 14.09.2006 व सुधारीत अधिसूचना दि. 01.12.2009 तरतूदीनुसार मे. इंडस ऑरगॅनिक्स, ए-१२, एमआयडीसी, गोरेगाव, ता. गोरेगाव, जिल्हा गोंदिया यांच्या ५ कि.लि/ दिन क्षमतेचे महुआ फुल/फळांवर आधारित आसवानी प्रकल्प, तसेच स्पिरिट / लिकरचे ब्लेंडिंग आणि बॉटलिंग प्रकल्प उभारण्याकरीताआवश्यक पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक १८/०९/२०२६ रोजी वेळ दुपारी १२.३० वाजता, प्रकल्प स्थळ ए-१२, एमआयडीसी, गोरेगाव, ता. गोरेगाव, जिल्हा गोंदिया, येथे मा. श्रीमती पुजा गायकवाड, उपविभागीय अधिकारी, तिरोडा यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्री. मनोज वाटाणे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर यांचे प्रतिनिधी व श्री. किशोर पुसदकर, उप-प्रादेशिक अधिकारी, भंडारा यांनी समन्वयक म्हणून काम केले. अध्यक्षांच्या संमतीने दुपारी १२.३० वाजता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांची यादी सोबत जोडलेली आहे. **(सहपत्र**-1).

**पार्श्वभूमी**

मे. इंडस ऑरगॅनिक्स, ए-१२, एमआयडीसी, गोरेगाव, ता. गोरेगाव, जिल्हा गोंदिया यांच्या ५ कि.लि/ दिन क्षमतेचे महुआ फुल/फळांवर आधारित आसवानी प्रकल्प, तसेच स्पिरिट / लिकरचे ब्लेंडिंग आणि बॉटलिंग प्रकल्प उभारण्याकरीता पर्यावरण अनुमतिसाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी मंडळास पत्र दि. १७/०७/२०२६ अन्वये अर्ज सादर केला होता. मंडळाचे मुख्यालयाने दि. २३/०७/२०२६. अन्वये जनसुनावणी प्रक्रिया सुरु करण्याबाबत निर्देश प्रदान केले होते. मा. जिल्हाधिकारी गोंदिया यांनी कार्यालयीन टिप्पणी दि. ११/०८/२०२६ अन्वये जनसुनावणी घेण्याबाबत स्थळ, व दिनांक यांस मंजुरी प्रदान केलेली होती.

**प्रयोजन व कार्यपध्दती**

उप-प्रादेशिक अधिकारी, भंडारा तथा संयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली, व जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही, असे स्पष्ट केले. या जाहीर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व प्राधिकरणाकडे पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप लेखी अथवा तोंडी सादर करावयाचे आहेत, त्याची नोंद घेतली जाईल व प्राधिकरणाकडे पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, भंडारा यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचना दिनांक 14 सप्टेंबर, 2006 नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक दि. १५/०८/२०२६ ला दैनिक द हितवाद (इंग्रजी) व दैनिक लोकमत (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना तिस दिवसांच्या मुदतीसह प्रसिध्द करण्यात आली असल्याचे सांगितले. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र**-2).

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. मंडळाचा आदेश दि. २३/०८/२०२६ नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली.

या आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे. (**सहपत्र**-3). सुनावणी पूर्वी दोन सूचना/ईमेलद्वारे प्राप्त झाले असून, एक माननीय खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांच्याकडून एक निवेदन प्राप्त झालेले आहे. सुनावणी दरम्यान एक आक्षेप प्राप्त झाले आहे.

सदर प्रकल्पाबांबत प्रकल्प धांरकानी सादर केलेली कार्यकारी सारांश इंग्रजी आणि मराठीत सॉफ्ट कॉपीसह खालील कार्यालयात लोकांच्या माहितीसाठी आणि अभ्यासासाठी ठेवण्यात आले होते व याबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आले होते.

१. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया.
२. जिल्हा परिषद कार्यालय, गोंदिया.
३. जिल्हा उदयोग केंद्र, गोंदिया.
४. उप-विभागीय कार्यालय, तिरोडा, जि. गोंदिया.
५. तहसिल कार्यालय गोरेगाव, जि. गोंदिया.
६. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, 5 वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
७. पर्यावरण व वातावरण बदल विभाग, 15 वा माळा, नवी प्रशासकीय इमारत, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-32.
८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, 3 रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.8, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-22.
९. क्षेत्रिय कार्यालय (पश्चिम मध्य क्षेत्र), पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भू-तल, पुर्व खंड, नवीन सचिवालय भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर-01.
१०. पंचायत समिती गोरेगाव, ता. गोरेगाव, जि. गोंदिया.
११. नगर पंचायत, गोरेगाव, ता. गोरेगाव, जि. गोंदिया.

तसेच कार्यकारी सारांश मंडळांचे संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेली होती.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, भंडारा तथा समन्वयक यांनी मे. इंडस ऑरगॅनिक्स, ए-१२, एमआयडीसी, गोरेगाव, ता. गोरेगाव, जिल्हा गोंदिया यांना सदर प्रस्तावित ५ कि.लि/ दिन क्षमतेचे महुआ फुल/फळांवर आधारित आसवानी प्रकल्प, तसेच स्पिरिट / लिकरचे ब्लेंडिंग आणि बॉटलिंग प्रकल्प उभारण्याकरीता व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकांचे तांत्रीक सल्लागार यांनी तपशिलवार मराठी मध्ये मे. इंडस ऑरगॅनिक्स, ए-१२, एमआयडीसी, गोरेगाव, ता. गोरेगाव, जिल्हा गोंदिया यांना सदर प्रस्तावित ५ कि.लि/ दिन क्षमतेचे महुआ फुल/फळांवर आधारित आसवानी प्रकल्प, तसेच स्पिरिट / लिकरचे ब्लेंडिंग आणि बॉटलिंग प्रकल्प उभारण्याकरीता पर्यावरण व्यवस्थापन योजना, व्यावसायीक आरोग्य आणि सुरक्षा व्यवस्थापन, हरित पट्टा विकास योजना, प्रकल्पाचे फायदे, पर्यावरण व्यवस्थापन योजना- खर्च, इत्यादीबाबत सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, भंडारा यांनी उपस्थित जनसमुदायाला, सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, किंवा लेखी सादर करावे असे आवाहन केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**1) श्री. जगदिश येरमवार, गोरेगांव, जि.गोंदिया**

| **अ. क्र.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय** |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावित प्रकल्पास पाण्याचा पुरवठा कुठून होणार. | यावर प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, हा प्रस्तावित प्रकल्प एमआयडीसी मध्ये असल्याने त्यांच्याकडुन पाण्याचा पुरवठा होणार किवा अधिकृत भूजल परवानगीव्दारे उपलब्ध केले जाईल. स्थानिक विहिरी किंवा गावाच्या पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतावर ताण |

| | | |
|---|---|---|
| | | आणणार नाही. |
| 2 | प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होणार नाही याची खात्री कशी करणार. | यावर प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, हा आसवणी प्रकल्प 'झिरो लिक्विड डिस्चार्ज' (ZLD) तंत्रज्ञानावर आधारित असेल. प्रक्रिया केलेले संपूर्ण ४९ घनमीटर सांडपाणी पुन्हा प्रकल्पातच वापरले जाईल. त्यामुळे कोणतेही दूषित पाणी बाहेर सोडले जाणार नाही. दुर्गंधी नियंत्रणासाठी आधुनिक सेंट्रिफ्युज, डस्ट कलेक्टर्स आणि बायो-फिल्टर्स/स्क्रबर्सचा वापर केला जाईल, ज्यामुळे आजूबाजूच्या प्रभागात किंवा रहिवासी भागात कोणतीही दुर्गंधी पसरणार नाही. या प्रकल्पामध्ये प्रत्यक्षरित्या कमीत कमी 20 लोकांना रोजगार मिळेल. तसेच अप्रत्यक्ष्यरित्या स्थानिक शेतकरी व महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. म.प्र.नि.मंडळाकडुन उद्योग उभारण्याचे संमतीपत्र प्राप्त झाल्यानंतर संमतीपत्रातील अटी व शर्तीचे पालन केल्यानंतर उद्योगाचे उत्पादन सुरू करण्यात येईल. तसेच संपुर्ण अनुपालन अहवालानंतर पर्यावरण विषयक परवाना मिळतो. यावर दर सहा महिन्यांनी अनुपालन अहवाल सादर करण्यातयेतो. पर्यावरणासाठी बाष्पकांमधुन उत्सर्जित होणाऱ्या धुळीकणासाठी बॅग फिल्टर ही हवा प्रदूषण यंत्रणा बसविण्यात येईल. |
| 3 | नगर पंचायतीस आपले पत्र प्राप्त झाले असून जन सुनावणी बाबत नगर पंचायतीच्या अधिकाऱ्यांनी जनसुनावणीबाबत पूर्वसूचना दिली नाही.<br>जर याचेवर सखोल अभ्यास झाला असता, तर आम्ही याच्यावर प्रकल्प चांगला आहे की वाईट याबाबत सांगू शकलो असतो. ही जी सुनावणी आज होत आहे, याला रद्द करून पुढे घेण्यात यावी, जेणेकरून स्थानिक परिसरातील नागरिकांना याची पूर्वकल्पना झाली पाहिजे आणि जे सर्वांचे मत होईल त्याला आम्ही समर्थन करू. नाहीतर उद्या काय होईल की नगरपंचायत बदनाम होईल, की या लोकांनी दारूची फॅक्टरी उघडली, बदनाम नगरपंचायतीचे पदाधिकारी होतील याकरिता आपण याच्यावर विचार करावा. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |
| 4 | या प्रकल्पास १५ किलोमीटर दुर आमगाव तालुक्यातील नागरीक येथे येऊन पाठींबा देतो हे बरोबर नाही. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |
| 5 | आमचा आदिवासी बहुल क्षेत्र आहे. शेतकरी व आदिवासी मोहफुल संकलन करतात काही लोक हात भट्टीवरुन दारु काढतात व तो त्यांचा रोजगाराचे साधन आहे परंतु ते अवैध असल्याने पोलीस विभाग त्यांचेवर कारवाई करतात, इंडस्ट्रीवाले कमी भावात मोहफुल विकत घेऊन उच्चभावात दारु विकतात व त्यामुळे या प्रमाणे गांवामध्ये छोटे छोटे उदयोग करुन | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | त्यांना अधिकृत करण्यात यावे जेणे करुन रोजगारांचे साधन होईल. | |

2) **श्री. कमलेश बारेवार, गोरेगांव, जि.गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| 1 | प्रकल्पाधारकाने नगर पंचायत गोरेगांव किंवा ग्रामपंचायत हिरडामालीचे ना-हरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही. हा प्रकल्प नियोजीत गावांसाठी आहे किंवा गावकऱ्यांसाठी आहे. | या प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, हा प्रकल्प एमआयडीसी अंतर्गत असल्याने स्थानिक नगर पंचायत किंवा ग्रामपंचायतचे ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. |

3) **श्री. हिदायत शेख, गोरेगांव, जि.गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| 1 | या प्रकल्पाबाबत वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिलेली होती. परंतु सर्व सामान्य जनतेला व स्थानिक नगर पंचायत, ग्रामपंचायत ला माहिती देणे आवश्यक होते. जेणेकरुन अपेक्षित जनता उपस्थित राहीली असती. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. |
| 2 | प्रकल्प सुरु होईपर्यत सर्व चांगले सांगतात व त्यानंतर कोणी दखल घेत नाही व सर्वसामान्याना त्रास होतो. म.प्र.नि.मंडळाने प्रकल्पास परवानगी दिल्यानंतर प्रकल्पामध्ये कोणत्या उपाययोजना केल्या याची शहानिशा कधी करता याची माहीती दयावी. | यावर उप-प्रादेशिक अधिकारी यांनी सांगितले की, प्रदूषणकारी उद्योगाची नियमित पाहणी व तपासणी करण्यात येते. अटी व शर्तीचे उल्लंघन आढळल्या कायदेशीर कारवाई करण्यात येते. |

4) **श्री. पवन रहांगडाले, सभापती, नगरसेवक, नगर पंचायत, गोरेगांव, जि.गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| 1 | नगर पंचायत हद्दीमध्ये 100 मीटर अंतरावर गोंदिया शहराचा कचऱ्याचे प्रक्रिया केंद्र असून पूर्णपणे हिरडामाली व आमच्या प्रभाग क्रमांक १ परिसरात दुर्गंधीचे वातावरण आहे. या प्रस्तावित प्रकल्पामध्ये दुर्गंधीची समस्यासाठी काय नियोजन आहे. | वरील प्रमाणे |

5) **श्री. तेजराम, अध्यक्ष, नगर पंचायत, गोरेगांव, जि.गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| 1 | या जनसुनावणीच्या संदर्भात जी लोकांना माहिती मिळाली पाहिजे होती त्याप्रमाणे लोकांना मिळाली नाही आणि म्हणून आतापर्यंत या ठिकाणी लोकांचा जो सहभाग पाहिजे होता तो या ठिकाणी दिसून येत नाही. जोपर्यंत जनतेच्या मनाचे समाधान पूर्ण होणार नाही तोपर्यंत हा प्रकल्प राबवण्यात येत आहे त्यासाठी आम्ही परवानगी देऊ शकत नाही. विशेष करून नगरपंचायत किंवा ग्रामपंचायतीची तुम्हाला परवानगी पाहिजे होती त्याचे पत्रसुद्धा घेतले गेले की नाही मला | मुद्यांची नोंद घेण्यात आली. |

| | |
|---|---|
| | माहीत नाही व जनसुनावणी आज होता कामा नये, याला आमचा विरोध आहे. | |

6) **श्री. राहुल येल्ले, सदस्य, नगर पंचायत, गोरेगांव, जि.गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| 1 | या जनसुनावणीमध्ये स्थानिक नागरिकांची संख्या कमी आहे. एकीकडे संपूर्ण देशामध्ये भारत नशामुक्त देश म्हणजे सरकार नशा हटाव धोरण राबवित आहे तर मग आमच्या युवा पिढीवर, विद्यार्थ्यांवर काय परिणाम पडेल याचेही उत्तर आम्हाला इथून हवे आहे. या प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांवर व दुर्गंधीमुळे स्थानिकांच्या आरोग्यावर परिणाम होईल. ही जनसुनावणी पुढे ढकलण्यात यावी. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

7) **श्री. सुरेश जियालाल चन्ने, माजी सदस्य, गोरेगांव, जि.गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| 1 | या प्रकल्पाबाबत सर्व सामान्य जनतेला माहिती मिळालेली नाही. आमगांव-गोरेगाव ठाणा गांव रोडवर टायर पासुन तेल तयार करणाऱ्या उद्योगापासून आरोग्यावर धोका होत आहे याबाबत ग्रामपंचायत, प्रदूषण विभाग व जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदियाला तक्रार दिलेली असून अद्याप उद्योगावर कुठलीही कारवाई झालेली नाही, नम्र विनंती आहे की त्या फॅक्ट्रीला आणि संबंधित ग्रामपंचायतीला भेट दयावी ही फॅक्ट्री बंद व्हायला पाहिजे अशी एक सुचना मी आपल्या वतीने करत आहे. | यावर उप-प्रादेशिक अधिकारी यांनी सांगितले की, याबाबत कुठलीही तक्रार प्राप्त नाही. तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित उद्योगाची पाहणी करण्यात येते व कायदेशीर कारवाई करण्यात येते. |

8) **श्री. विजय महल्ले, हिरडामाली, जि.गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| 1 | या प्रकल्पामध्ये स्थानिकांना रोजगार मिळेल व गोरेगांव एमआयडीसी रोजगारासाठी आहे. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

9) **श्री.अजय राऊत, हिरडामाली, जि.गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| 1 | प्रकल्पालगत नागरीकांच्या आरोग्यावर परिणाम होणार नाही हे स्पष्ट झाले पाहीजे आणि गावातील बेरोजगारांना रोजगार मिळाला पाहीजे. | वरील प्रमाणे. |

10) **श्री. संजय जगणे, गोरेगाव ठाणे, जि.गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| 1 | या प्रकल्पामध्ये स्थानिकांना रोजगार मिळेल व प्रकल्प सुरू व्हावा. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

11) **श्री. सुरेश बिसेन, हिरडामाली, जि.गोंदिया.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| 1 | या एमआयडीसीमध्ये दारूची कंपनी येत असल्याने ग्रामपंचायत व नगर पंचायतचे ना-हरकत प्रमाणपत्र कां लागत नाही. शासनास महसुल मिळतो. दारूमुळे गावकऱ्यांचे संसार उध्वस्त होतात. हा प्रकल्प येथे येवू नये व या प्रकल्पास आमचा विरोध आहे. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

12) **श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणतज्ञ**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावित प्रकल्पास समर्थन दर्शवून औद्योगिक विकासास पाठिंबा दिला. प्रस्तावित प्रकल्पाची रू. 2.0 कोटी गुंतवणुकीमध्ये 20 लोकांना रोजगार मिळणार. या प्रकल्पास स्थानिक शेतकऱ्यांकडून महुआ फुलाची खरेदी करण्यात येईल. या प्रकल्पास विना अटी व शर्तीसह पर्यावरण विषयक परवाना देण्यात यावा. प्रकल्पामध्ये शुन्य निष्कषण प्रणाली उभारावी **(ZLD)**. प्रकल्पधारकाने आरोग्या शिबीर घ्यावे. परीसरामध्ये फळझाडांची वृक्षलागवड करावी. स्थानिक कुशल व अकुशल लोकांसाठी कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दयावे. प्रकल्पाच्या व्यवस्थापनाने स्थानिकांच्या संपर्कात राहावे. प्रस्तावित प्रकल्पास हार्दिक शुभेच्छया दिल्या. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

13)- -

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| 1 | ज्या लोंकानी उदयोगास समर्थन दिलेले आहे ते स्थानिक नाहीत त्यांनी आपल्या गावामध्ये फॅक्टरी टाकावी आम्हाला आमच्या हिरडामाली गांवामध्ये दारुची फॅक्टरी नको. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

श्री. मनोज वाटाणे सदस्य यांनी सांगितले की, आजच्या सभेतील जनतेच्या सर्व हरकती व सुचनाची नोंद घेण्यात येत असून त्याचे इतिवृत्त प्राधिकरणाकडे पाठविण्यात येईल.

मा. अध्यक्ष यांनी समारोप प्रंसगी सांगितले की, सदर उदयोगाचे पर्यावरण विषयक जाहीर सुनावणी आज घेण्यात आली आणि या सुनावणीचे समितीस उदयोगाबाबत निर्णय घेण्याचा अधिकार नसून जनसुनावणीचा उद्देश लोकभांवना, जनतेचे विचार आक्षेप इत्यादी जाणून घेऊन व त्याची नोंद घेऊन प्राधिकरणाकडे पाठविणे हे आहे. लोंकानी विचारलेल्या शंकाचे उत्तर उदयोगाचे सल्लागार प्रतिनिधी यांनी दिलेली आहेत. आजच्या सभेमध्ये व्यक्त केलेल्या मुदयांची नोंद घेण्यात येईल व प्राधिकरणास सादर करण्यात येईल. प्रदुषणाबाबतच्या जे काही तक्रारी असतील त्या प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयास सादर करता येईल.

अध्यक्षांच्या परवानगीने आभार प्रदर्शन करुन जनसुनावणी संपली असे जाहीर करण्यात आले.

(हेमा देशपांडे)
सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर

(किशोर पुसदकर)
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, भंडारा

(पुष्पा गायकवाड)
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप-विभागीय अधिकारी, तिरोडा, ता.तिरोडा, जि.गोंदिया